मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालय, सिन्नर जि. नाशिक. **आणि** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजना यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, संरक्षणशास्त्र व आय.क्यु.ए.सी. विभागातंर्गत आंतरविद्याशाखीय एकदिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्र

# ''महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी चर्चासत्र अहवाल''

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत व महाविद्यालयातील **राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, संरक्षणशास्त्र, आय.क्यू.ए.सी. विभागांच्या** वतीने **''महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी''** या आंतरविद्याशाखीय शिर्षकाखाली एकदिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे **शनिवार दि. २४/०२/२०१८** रोजी यशस्वीपणे संपन्न झाले. या चर्चासत्राचे उद्‌घाटन मविप्र समाज संस्थेचे चिटणीस डॉ.सुनिल ढिकले यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक मा. श्री.हेमंतनाना वाजे होते. सदर कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर जेष्ठ आदिवासी साहित्यिक डॉ.विनायक तुमराम प्रमुख बीजभाषक म्हणून तर डॉ.पी.डी.देवरे, डॉ.प्रशांत अमृतकर, श्री. मुकुंद दिक्षीत डॉ. पी.ए.घोष, प्राचार्य डॉ.जे.डी.सोनखासकर डॉ.व्ही.डी.कापडी, प्रा. उपप्राचार्य आर.व्ही.पवार, समन्वयक प्रा. ए.ए.पोटे, संयोजक, प्रा.एस.के.आवारे, डॉ. एस.एन पगार, प्रा.आर.डी.आगवाने, डॉ.अमोल काटेगावकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.जे.डी.सोनखासकर यांनी केले या प्रसंगी त्यांनी चर्चासत्राची भुमिका व उद्‌देश स्पष्ट करतांना म्हटले की, आदिवासींचे प्रश्न त्यांच्यापुरते मर्यादित नसून ते तुमचे आमचे आहेत असे जोपर्यंत वाटत नाही तोपर्यंत ते सुटणार नाहीत. शासनाने आदिवासींच्या शिक्षण, आरोग्य, दळणवळण, त्यांचे सर्व मानवी अधिकार याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. आदिवासी महिलांना राजकारणात आरक्षण दिलेले असुनसुध्दा त्याची योग्य आणि वास्तविक अमलबजावणी होत नाही. त्यामुळे योग्य ते उपाय करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे उद्‌घाटक व मविप्र समाज संस्थेचे चिटणीस डॉ.सुनिल ढिकले यांनी आपल्या भाषणात अलिकडे आदिवासी समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलने गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना पायाभूत सुविधा व दैनंदिन गरजा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तरच आदिवासी समाजआपल्या बरोबर सन्मानाने जगू शकेल. आदिवासी समाजाला रोजगार उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक मा. श्री.हेमंतनाना वाजे यांनी अध्यक्षीय मनोगतातून छत्रपति शिवाजी महाराजांना औरंगजेबाच्या विरूध्द लढतांना तसेच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी समाजाचे योगदान मोलाचे आहे.

बीजभाषणात डॉ.विनायक तुमराम यांनी आदिवासी समाजाच्या चळवळींची ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी या विषयावर आपले विचार मांडले. असे म्हटले की आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवायचे असतील तर आधुनिक काळात आदिवासी संकल्पना समजून घेणे काळाची गरज आहे. जगाच्या इतिहासात आदिवासींचे कार्य उल्लेखनीय ठरले आहे. आदिवासीचा इतिहास, सामाजिक, अर्थिक, राजकीय व भौगोलिक प्रश्न समजून घेउनच त्यांना सद्यकालीन समाजप्रवाहाबरोबर आणले पाहिजे यासाठी त्यांच्या विषयी आखलेल्या योजना ध्येय धोरणे प्रत्यक्ष अमलात आणणे गरजेचे आहे. हे निष्पन्न झाले तरच चर्चासत्र यशस्वी होइल. आदिवासी समाजाच्या विविध बोली, भाषा, परंपरा, चालीरीती आजही टिकून आहेत. त्याठिकाणी वैचारिक व सांस्कृतिक देवाण घेवाण झाली पाहिजे कारण अशा सांस्कृतिक चळवळीतून मानवी जीवनाच्या समस्या व त्यावर उपाय योजना आखल्या जातात. शैक्षणिक चळवळीचा परिणाम त्यांची विचार पद्धती व जीवनमानात सुधारणा झाली. परंतु आदिवासी समाज हा दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशात राहत असल्याने अनेक समस्यासह आदिवासी समाज अलीकडे जाणीवयुक्त संघर्ष करताना दिसतो.

दुसऱ्या सत्राच्या अध्यक्ष म्हणून जेष्ठ अभ्यासक डॉ.पी.डी.देवरे तर विषय तज्ञ म्हणून डॉ.प्रशांत अमृतकर यांनी महाराष्ट्रातील आदिवासी समुहाचा राजकीय व सामाजिक विकासात्मक वाटचालीविषयी आपली भुमिका स्पष्ट केली आदिवासी समाज हा अज्ञान, अशिक्षित, अंधश्रध्दाळू, रुढी, परंपरा यामध्ये आजही गुरफटलेला आहे. आदिवासींना इतर नागरिकांप्रमाणे जीवन जगता यावे, त्यांना मानवी हक्कांचा उपभोग घेता यावा, यासाठी सर्व पूरक सुविधा पुरविण्याचा प्रयत्न आजही स्वातंत्र्योत्तर काळापासून सुरु आहे. मात्र भ्रष्टाचार , निरक्षरता, नेतृत्वहिनता, व्यसनाधिनता, वेठबिगारी, कुपोषण, राजकीय उदासिनता, प्रभावी संघटनांचा अभाव इ.त्यामुळे आदिवासी समाज आपले हक्क, अधिकार यांपासून अनभिज्ञ आहे. परिणामी सत्तेसाठीची राजकीय साठेमारी आणि मुलभूत हक्कांबाबतच्या समस्या, प्रश्न यांच्या जात्यात

भरडला जाऊन आदिवासी समाज हा मुळ नागरी विकास प्रवाहापासून दूर फेकला गेला आहे. म्हणून संविधानात्मक उदिष्टपूर्तीसाठी आदिवासी समाजाला आपले अस्तित्व, आपले मुलभूत मानवी हक्क यांची जाणिव होणे आवश्यक आहे.

तीसऱ्या सत्रात अध्यक्ष डॉ.पी.ए.घोष तर विषयतज्ञ म्हणून प्रा.पांडुरेग भोये महाराष्ट्रातील आदिवासीचे राजकारण, नेतृत्व आणि राजकीय विकास या विषयावर आपली भूमिका मांडली. भारतात आदिवासींच्या ज्या महत्वाच्या चळवळी निर्माण झाल्या. त्यापैकी राजकीय चळवळी ही स्वायतत्ता म्हणून ओळखली जाते. स्वातंत्र व समानतेच्या तत्वावर निर्माण झालेल्या भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टानुसार आदिम जमातींना स्वायत्तता प्रदान करण्याची तरतूद आहे. आदिवासी बांधवांना राजकीय स्वायत्तता म्हणजे आदिवासीचे राजकीय प्रशासन आदिवासींद्वारा चालवणे होय. म्हणून भारतीय राज्यघटनेच्या तरतूदीनुसार आदिवासी बांधवांना राजकारणात व स्थानिक प्रशासनात आरक्षणामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा आदिंद्वारे राजकीय स्थान मिळविले आहे. आदिवासी बांधवांना आपल्या हक्कांची प्राचीन काळापासून जपलेली नैसर्गिक साधनसंपत्ती, आपल्या मालकीसाठी झगवे लागले. सामाजिक व धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनात संघर्ष करुन अस्तित्व टिकविण्याची दिर्घकालीन लढाई व चळवळींना सामोरे जावे लागले. सध्या आदिवासी बांधवांना राजकीय स्वायत्ता टिकवून ठेवणे महान कठिण बनले आहे. त्यासाठी मोर्चा, आंदोलन, चळवळी करावी लागत आहेत. आदिवासी समाजाचे सांस्कृतिक, आध्यात्मिक संस्कृती वेगळी आहे तो प्रेमळ, प्रामाणिक हळवा, लाजरा समाज असून आधुनिक समाजापासून अद्याप कोस दूर आहे. राजकीय अस्तित्वासाठी शासकीय लाभासाठी आरक्षण टिकविण्याची मोठी कसरत, संघर्ष करावा लागत आहे.

चौथ्या सत्रात अध्यक्ष डॉ.जे.डी.सोनखासकर तर विषयतज्ञ म्हणून श्री.मुकुंद दिक्षीत यांनी महाराष्ट्रातील आदिवासींचे घटनात्मक आणि मानवी हक्क या विषयावर भूमिका मांडली. यात भारतीय राज्यघटनेने आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांना संरक्षण देवून त्यांचे भौतिक जीवनमान उंचावण्यासाठी विशेष तरतुदी केल्या त्या म्हणजे समतेचा अधिकार कलम १४—१८ शोषणाविरूध्दचा अधिकार कलम २३ मार्गदर्शक तत्वातील शैक्षणिक व अर्थिक विकासाची तरतुद कलम ४६ कलम ३३० व ३३२ नुसार संसद विधीमंडळे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्वाचा अधिकार दिला. सार्वजनिक नोकरीतील प्रतिनिधीत्वाचा दावा कलम ३३५ राष्ट्रीय आयोग कलम ३३८ अ अशा तरतुदी आहेत. संविधानात केलेल्या व्यापक व भरीव तरतुदींचा लाभ आदिवासी समाजाला मिळावा म्हणून केंद्र व राज्य सरकारांनी राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणी करत आदिवासी विकासात्मक कायदे केले. दोन्ही सरकारांनी घटनात्मक तरतुदींना अनुसरुन वेठबिगारी निर्मुलन, अत्याचार प्रतिबंधक जमीन संदर्भातील हक्क, जंगल हक्क, कुळ वहिवाट इत्यादी संदर्भातील केलेले कायदे आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी निश्चितच उपयुक्त ठरले आहेत. महाराष्ट्र जनजाती सुधारणा कायद्यामुळे पिढयानपिढया आदिवासींचे होणारे शोषण व आर्थिक पिळवणूक थांबण्यास काही प्रमाणात मदत झालेली आहे, असे दिसून येते.

समारोप सत्रामध्ये डॉ.व्ही.डी.कापडी, डॉ.श्रीमती के.एम.अहिरे, प्रा.प्रदिप देशपांडे, प्रा.ज्ञानोबा ढगे, प्रा.थोरात यांनी चर्चासत्राच्या यशस्वीविषयी व्यासपीठावर प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या चर्चासत्रात ५६ प्राध्यापक आणि ७२ विद्यार्थ्यांनी अशा एकुण १२८ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. समारोप सत्राचे आभार प्रा.ए.ए.पोटे तर सुत्रसंचलन प्रा.आर.डी.आगवाने यांनी केले. या चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्रा.एम.जी.ठाकरे, प्रा.श्रीमती एस.आर.शिंदे, प्रा.श्रीमती ए.आर.पगार, प्रा.एम.जी. ठाकरे, प्रा.डॉ.एस.के.दळवी, प्रा.डॉ.एस.एन.पगार, प्रा.नामदेव काकड, प्रा.डी.के.खुर्चे, प्रा.पी.के.शिंदे, प्रा.के.एस.गोपाळे, प्रा.एस.एम.गाडे, प्रा.मनोहर जोपाळे, प्रा.यु.ए.पठाडे, प्रा.डॉ.डी.एल.फलके, प्रा.अशोक भवर,, प्रा.वाय.एल.भारस्कर, श्री.डी.बी.कानडे., श्री.एस.बी.तांबे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



**प्रा.ए.ए.पोटे**
**समन्वयक**






MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
SCIENCE COLLEGE SINNAR
सा.फु. पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित
आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र
इतिहास, अर्थशास्त्र, संरक्षणशास्त्र आणि आय.क्यु.ए.सी. विभाग
" महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी "
शनिवार, दि. २४ फेब्रुवारी २०१८


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR


INNAR


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR
मराठा विद्या प्रसारक समाजाचे,
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर
सा.फु. पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित
आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र
राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, संरक्षणशास्त्र आणि आय.क्यु.ए.सी. विभाग
" महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी "
शनिवार, दि. २४ फेब्रुवारी २०१८
कार्यक्रमाचे अध्यक्ष
कार्यक्रमाचे उद्घाटक
प्रमुख अतिथी
प्रमुख बीजभाषक
विषय तज्ञ
स्वागतोत्सुक


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR
आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र
" महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी "